**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

२२. हे म्हणणे खरे नाही की, मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ व हि.नं.५४ या मिळकती मोतिराम यांच्या खरेदीच्या मिळकती आहेत. प्रस्तुत मिळकती संबंधी वादी यांनी न्यायालयात हजर केलेली खरेदी खत मी पाहिलेली नाहीत. मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ व हि.नं.५४ या मिळकती बाबत वादी यांनी हजर केलेल्या कागदपत्रांची माहिती मी माझ्या वकिलांना विचारली होती. माझ्या वकिलांनी सदर मिळकतीबाबतचे कागदपत्रे मला दाखवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर कागदपत्रांमध्ये सदर मिळकती काशिराम बळवंत साटम यांनी मोतिराम गणपत तेली यांना विक्री केल्याचा उल्लेख होता. मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ व हि.नं.५४ या मिळकती संबंधीचे फेरफार तसेच पीकपाणी उतारे मी वाचलेले आहेत. मला सदर पीकपाणी उताऱ्यामध्ये गणपत हे नाव दिसले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती मोतिराम यांनी कूळपणास घेतल्यामुळे मला गणपत यांचे नाव दिसले नाही. माझ्या कथनानुसार गणपत यांच्या पासून मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ व हि.नं.५४ या मिळकती कूळपणास आमच्या कडे असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही.
प्रश्न – कैफियत व सरतपास दाखल करतेवेळेस मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ व हि.नं.५४ या मिळकती कूळपणास आमच्याकडे असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे आहे का याचा शोध घेतला होता का ?
उत्तर – एकत्र कुटुंब पध्दती असल्यामुळे वडील भाऊ या नात्याने सर्व कागदपत्रे मोतिराम कुवळेकर यांच्याकडे होते.

२३. माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र.१५ मधील नमुद मजकूर स.नं. ७०अ१अ१अ हि.नं.५४ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेल्या आर्थिक मदतीमधून कुटुंबाने संपादीत केली याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. आर्थिक मदत कशाच्या स्वरुपात केली हे नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आर्थिक मदत न केलेली असल्याने त्याबाबत सरतपासात नमूद केलेले नाही. मी

न्यायालयात सन १९८५ सालापासूनचा बँकेचा खाते उतारा हजर केलेला आहे. सन १९८५ पुर्वीच्या माझ्या आर्थिक उलाढालीचा पुरावा न्यायालयात दिला आहे. मी बँकेची स्टेटमेंट दिलेली आहे. मी सन १९८५ सालापासूनची बँकेची स्टेटमेंट हजर केलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ या मिळकतीचे खरेदी खत दि.०५/०५/१९७० रोजीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खतामध्ये गोडया पाण्याच्या विहीरीचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खतामध्ये घर क्र.४४३ हे मोतिराम तेली यांच्याकडे भाडयाने चालले होते असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र.४४३ हे स.नं.८५ हि.नं.६ मध्ये आहे.

२४. मी नोकरीस सन १९७० साली लागलो. माझा भाऊ रामचंद्र सन १९६८ साली नोकरीस लागला. मी जानेवारी महिन्यात नोकरीस लागलो. त्याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ या मिळकती रक्कम रु.५००/– खरेदी घेतल्या. सदर खरेदी खतामध्ये मौजे धोपटेवाडी येथील स.नं.८५ हि.नं.६, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.४८ या मिळकती मोतिराम यांच्याकडे कूळपणास होत्या असा उल्लेख नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.५४ ही मिळकत स.नं..७०अ१अ१अ हि.नं.४८ च्या पोटामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, स.नं.७०अ१अ१अ हि.नं.५४ ही मिळकत मोतिराम याने दि.०८/०८/१९७३ रोजी खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीमध्ये कृष्णा महादेव लाड हे राहत असलेल्या केंबळी घराचा इमला होता. हे म्हणणे खरे नाही की, कृष्णा महादेव लाड यांच्याकडे सदर मिळकत भुईभाड्याने चालली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत खरेदी खताच्या तीन वर्षापुर्वी मोतिराम गणपत तेली यांच्या ताब्यात दिली होती. सदर मिळकत खरेदी करण्या करिता आम्ही आर्थिक मदत केली हे दाखविण्याकरिता कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर केलेला नाही. आर्थिक मदत कशा पध्दतीने केली याचा उल्लेख करण्यास मला काही अडचण नव्हती. काशिराम बळवंत साटम हे माझ्या परिचयाचे होते. त्यांची मुले माझ्या परिचयाची आहेत. त्यांच्या मुलांना मी साक्षीदार म्हणून प्रस्तुत प्रकरणी तपासणार नाही.

२५. सन १९७० पुर्वी माझे व वडिलांचे रेशन कार्ड एकत्र असल्याबाबत कागदोपत्री

पुरावा मी न्यायालयात हजर करणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडिलांच्या हयातीमध्ये आम्ही तिघे भाऊ वेगळे झाल्यामुळे मी एकत्र रेशनकार्डचा पुरावा देऊ शकत नाही.

२६. मी स.नं.१६६ हि.नं.३०ब+ ३१+ ३९ या मिळकतीचे खरेदी खत पाहिले आहे. नारायण विठ्ठल चव्हाण व लक्ष्मण विठ्ठल चव्हाण यांच्याशी माझे संबंध चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, स.नं.१६६ हि.नं.३०ब+ ३१+ ३९ ही मिळकत समाविष्ट करुन चव्हाण कुटुंबियांमध्ये एक वाटपाचा दावा चालला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मोतिराम तेली हे पक्षकार होते. सदर दाव्याची माहिती मला नारायण विठ्ठल चव्हाण व लक्ष्मण विठ्ठल चव्हाण यांनी दिली होती. सदर दाव्यामध्ये मोतिराम याला पक्षकार केल्याचे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मोतिराम हा स.नं.१६६ हि.नं.३०ब+ ३१+ ३९ या मिळकतीचा एकमेव खरेदीदार असल्याने त्याला पक्षकार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, स.नं.१६६ हि.नं.३०ब+ ३१+ ३९ या मिळकतीच्या खरेदी खतामध्ये सदर खरेदीचा व्यवहार धनादेशाद्वारे झाल्याबाबत उल्लेख नाही.

प्रश्न – सदर खरेदी खताची रक्कम २,०००/–खरेदी खतादिवशी अगर त्यानंतर दिली ?

उत्तर – खरेदी खताची रक्कम २,०००/– आमची बोलणी झाली त्या दिवशी दिली होती.

खरेदी खतामध्ये रक्कम २,०००/– कधी दिल्याचा उल्लेख आहे याची मला माहीती नाही. मी सदर दाव्याच्या कामामध्ये नारायण विठ्ठल चव्हाण व लक्ष्मण विठ्ठल चव्हाण यांच्या वारसांना साक्षीदार म्हणून तपासणार नाही. खरेदी खतामधील मोबदला रक्कम २,०००/– चा उल्लेख बरोबर आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब......**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीकांत एस. पचंडी )

दि.१८/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड